**अहवाल**

**विषय: अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन, विविध उपक्रम व भौतिक सुविधा याबाबत विद्यार्थ्यांचे समाधान**

शाळेमध्ये अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक व विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी तसेच मूल्यमापन, विविध शैक्षणिक उपक्रम व भौतिक सुविधा सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अभिप्रायाला विशेष महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्यांचे समाधान जाणून घेण्यासाठी शाळेत नियोजनबद्ध पद्धतीने अभिप्राय संकलन व नोंद प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या सूचनांची नोंद करण्यासाठी स्वतंत्र **सूचना नोंदवही** ठेवण्यात आलेली आहे. या नोंदवहीत विद्यार्थ्यांनी अध्ययन-अध्यापन पद्धती, शिक्षकांचे मार्गदर्शन, मूल्यमापन पद्धती, शालेय उपक्रम व उपलब्ध भौतिक सुविधा याबाबत दिलेल्या सूचनांची नियमित नोंद केली जाते. या सूचनांचे विश्लेषण करून आवश्यक त्या सुधारणा करण्याचा प्रयत्न शाळा व्यवस्थापन व शिक्षकांकडून केला जातो.

तसेच विद्यार्थ्यांचे समाधान व अपेक्षा जाणून घेण्यासाठी **अभिप्राय पुस्तिका** ठेवण्यात आलेली आहे. या पुस्तिकेद्वारे विद्यार्थी आपले मत मोकळेपणाने व्यक्त करतात. विद्यार्थ्यांच्या अभिप्रायावरून अध्ययन प्रक्रिया अधिक सुलभ व आकर्षक करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मूल्यमापन प्रक्रियेत पारदर्शकता व न्याय्यता राखण्यावर भर दिला जातो.

विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांच्या सूचनांचा विचार केला जातो. तसेच शाळेतील भौतिक सुविधा (वर्गखोल्या, पिण्याचे पाणी, स्वच्छता, क्रीडा साहित्य इ.) सुधारण्यासाठीही विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांचा उपयोग करण्यात येतो.

वरील सर्व प्रक्रियेचे पुरावे म्हणून विद्यार्थ्यांनी सुचवलेल्या सूचनांची नोंदवही व अभिप्राय पुस्तिकेचे छायाचित्र सादर करण्यात आलेले आहेत. यावरून विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यांच्या समाधानाचा स्तर स्पष्टपणे दिसून येतो.

# तक्रार व सूचना नोंदी तसेच निराकरण नोंदवही

| अनु. क्र. | दिनांक | तक्रार तपशील | तक्रारदार | संबंधीत विभाग | तपासणी दिनांक | केलेली कार्यवाही | जबाबदार अधिकारी | निराकरण दिनांक | स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 30/06/2025 | दि. 15/06/2025 पासून शैक्षणिक सत्र 2025-26 ला सुरुवात झाली. या महिन्यामध्ये कोणतीही सूचना किंवा तक्रार प्राप्त झाली नाही. | | | | | | | निरंक |
| 02 | 08/07/2025 | वर्गात पंखा बंद आहे | मयुर कुटे sci (12th) | कार्यालय | 8/07/25 | पंखा दुरुस्तीला पाठवला | धुर्वे सर | 9/07/2025 | पूर्ण |
| 03 | 14/08/2025 | खेळांचे साहित्य वाढवावे | तिलोत्तमा प्रमुख | क्रीडा विभाग | 16/08/2025 | नवीन साहित्य खरेदी | क्रीडा अधिकारी | 30/08/2025 | पूर्ण |
| 04 | 15/09/2025 | शौचालय स्वच्छ नाही | मधुरी मांढरे | स्वच्छता विभाग | 15/09/2025 | स्वच्छतेची व्यवस्था केली | श्री ठाकूर | 16/09/2025 | पूर्ण |
| 05 | 26/09/2025 | ग्रंथालय वेळ वाढवावी | रोशन थायवडे | ग्रंथालय | 27/09/2025 | वेळ 1 तास वाढवली | ग्रंथपाल | 01/10/2025 | पूर्ण |
| 06 | 11/11/2025 | वर्गात प्रकाश कमी आहे. Room No. 01 मध्ये | — | कार्यालय | 11/11/2025 | नवीन लाइट लावले | धुर्वे सर | 13/11/2025 | पूर्ण |

# विद्यार्थी अभिप्राय पुस्तिका [STUDENT FEEDBACK REGISTER]

| अनु.क्र. | दिनांक | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | विषय | अभिप्राय | सुधारणा | कार्यवाही | स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 30/06/2025 | मानसी माहूरे | 12th sci | गणित | शिकवण्याची पद्धत चांगली | — | — | पूर्ण |
| | | | | संबंधीत विभाग - शैक्षणिक | | | | |
| 02 | 18/07/2025 | मयुरी मांढरे | 12th sci | वाचनालय | पुस्तकांची संख्या वाढवावी | नविन पुस्तके द्यावीत | प्रस्ताव पाठवला | सुरू |
| 03 | 22/08/2025 | लक्ष्मी मोहर्ले | 12th sci | स्वच्छता | स्वच्छता चांगली आहे | — | — | सुरू |
| 4 | 26/09/2025 | रोशन दायवाडे | 12th sci | इंग्रजी | शिकवण्याची पद्धत चांगली | — | — | पूर्ण |